अशा आनंदी वातावरणात मन प्रफुल्लीत होतं. आषाढाच्या घोर पावसाने पृथ्वीवरील घाण वाहून जाते. श्रावणात आषाढासारखा भेडसावणाणरा ढगांचा भयानक गडगडाट नसतो किंवा विजेचा जीवघेणा कडकडाट नसतो, तर ढगांनीही सौम्य रुप धारण करुन, विजांचा सुखद लखलखाट बरोबर आणलेला असतो. यामुळे या आनंदी दिवसांचा आनंद वाढविलेला असतो. राना-वनाचं दृश्य तर अप्रतिम असतं. गुरं चारा खाऊन मस्त झालेली असतात. वासरं नाकात वारं भरुन बागडत असतात. बागडणाऱ्या वासरांना पाहून गाई हंबरतात. छे ! याचे वर्णन शब्दांनी करणे अशक्यच! परमेश्वरानं जणू जलवर्षावा बरोबर आनंदाची बरसातच केलेली असते.

या महिन्यातच सणावारांची रेलचेल असते. भारतीय संस्कृतीत अनेक पर्व साजरे केले जातात. प्रत्येक पर्वापासून कांही ना कांही शिकायला मिळते. या महिन्यात श्रियाळ षष्टी, नागपंचमी, रक्षाबंधन(श्रावणी), श्रीकृष्ण जयंती, पोळा इत्यादी प्रमुख सण येतात. भारतीय माणूस एवढा सहृदयी आहे की, तो माणसाशी तर सौहार्दाने वागतो यात नवल नाही, परंतु सापांसारख्या प्राण्यांना देखील विसरत नाही. जणू हा एक प्रकारे **बलिवैश्वदेव यज्ञच** करतो. पंचमीचा सण हा सासुरवाशीणी स्त्रियांसाठी आनंद देणारा असतो. नवीन लग्न झालेल्या

लेकींना माहेरी आणलं जातं. माहेरी आल्यावर सासरचा धाक नसतो. मैत्रिणी जमा होतात. गप्पा-गोष्टी करतात, गाणी गातात. भुलोबा भोवती फेर धरतात व अनेक आख्याने मुखपाठ गातात. ती गाणी ऐकताना प्रत्येक महिला जणू बहिणाबाईचं रुपच वाटते. हिंदोळे खेळतात व आंनदाचा मनमुराद आस्वाद घेतात. पोळा म्हणजे शेतकऱ्यांचा बैल, गाई इ. प्राण्याविषयी असलेल्या कृतज्ञेचा दिवस. त्या दिवशी बैलाकडून काम करुन घेतं नाहीत. त्यांना आंघोळ घालतात, तेल पाजतात, अंगावर रंगी-बेरंगी नक्षी काढली जाते. शिंगात खोबळे, वेगवेगळी कागदी फुले, गोंड, बाशिंग व पाठीवर सुंदर झूल घालून नटवतात. नंतर त्यांची मिरवणूक वाजत-गाजत काढतात. केवढी ही प्राण्याबद्दलची सहृदयता...?

या पारंपारिक सणांव्यतिरिक्त एक अनुपम तसाच जीवनातील अतिमोलाचा सण म्हणजे 'श्रावणी'. श्रावणी हे अति महत्वाचे, जीवनाला योग्य दिशा देणारे वैदिक पर्व ! यालाच संकल्प पर्व किंवा स्वाध्याय पर्व असेही म्हणतात. याचे पूर्ण नाव 'श्रावणी उपाकर्म' अर्थात् ऋषितर्पण आहे. या दिवसापासून वेदाचा स्वाध्याय केला जातो. श्रवण केले जाते. म्हणूनच त्याचे नाव श्रावणी पडले असावे. या पर्वापासून वेदाचा स्वाध्याय आरंभ होतो. म्हणून या पर्वाला **ऋषितर्पण** ही म्हणतात.

'स्वाध्यायेनार्चयेद् ऋषीन् ।।'

एके ठिकाणी स्मृतिकार लिहितात -

श्रावण्यां पौष्ठपद्यां
वाप्युपाकृत्य यथाविधि ।
युक्तश्छन्दांस्यधीयीत
मासान् विप्रोऽर्धपञ्चमान् ।।

अर्थात् ब्राह्मणादी वर्णांनी श्रावण पोर्णिमेपासून साडेचार महिने वेदाध्ययन करावे. या पर्वात यज्ञोपवीत बदलणे किंवा नूतन धारण करणे, ही परंपरा आहे. यज्ञोपवीत हे संकल्प सूत्र व विद्याध्ययनाचे चिन्ह आहे. मध्यंतरीच्या काळात केवळ रुढी म्हणून हे पर्व साजरे केले जाई. म.दयानंदांचे मानव जातीवर महान उपकार आहेत. त्यांनी जनजागृती करुन वैदिक मान्यतांचे पुनरुज्जीवन केले व पर्वाचा खरा अर्थ उलगडून दाखवला. स्वाध्यायाचे महत्व ध्यानात ठेवावे.

स्वाध्यायान्मा प्रमदः ।
स्वाध्यायप्रवचनाभ्यां
न प्रमदितव्यम् ।।

हे पर्व सत् ज्ञान, विद्या, विवेक

आणि धार्मिक बुद्धीच्या निश्चयासाठी आहे. परम प्रमाण वेदांचा स्वाध्याय म्हणजेच वेदपूजा ! धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे जीवनाचे चार पुरुषार्थ साधावयाचे असतील आणि बौद्धिक परिमार्जन करावयाचे असेल, तर वेदाध्ययनाशिवाय पर्याय नाही. वेदज्ञान सर्वप्रथम परमेश्वराने चार ऋषींना दिले. त्यांच्यापासून इतरांना ते ज्ञान श्रवणाने प्राप्त झाले म्हणून वेदाला 'श्रुती' ही म्हटले जाते.श्रवण, मनन, निदिध्यासन, आत्मसाक्षात्कार या साधनचतुष्टयात प्रथम 'श्रवण' चा क्रमांक येतो. ही महत्वाची पायरी आहे. म्हणूनच संतांनी म्हटले आहे- 'कानी जे पेरीले। नेत्री ते उगवले।।' जे ऐकले जाते, त्याचे संकल्पचित्र माणूस पाहत असतो. श्रवणीचे महत्व विशद करताना संत ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात म्हणतात- 'सर्व सुख पाहिजे असेल, तर लक्षपूर्वक ऐकले (श्रवण) पाहिजे.'

तरी एकले अवधान दिजे ।
मग सर्व सुखासि पात्र होईजे।
हे प्रतिज्ञोत्तर माझे ।
उघड आईका ।।

श्रवण करणारे इंद्रिय कान(कर्ण) होय. वेदशास्त्रात अनेक ठिकाणी कानाचे महत्व सांगितलेले आढळते.

'भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः।

तसेच संत साहित्यात कानांनी काय ऐकू नये याचेही दिग्दर्शन आहे. **'आणिकाचे कानी । निंदा स्तुती मना नाणी।।'** म्हणून कानाने भद्रच ऐकावे!

जीवन एक यज्ञ आहे. प्रत्येक इंद्रिय जीवन यज्ञाचे साधन बनावे. हे वेदश्रवणानेच घडू शक्ते. मंत्र ऐकल्यानेच अनेकांचे जीवन बदलून गेले आहे. नारदाचा उपदेश ऐकून वाल्याचा वाल्मिकी झाला. साधारण अमीचंद नावाचा माणूस देखील भक्त अमीचंद बनला. महर्षी दयानंदाचे एक वाक्य ऐकल्याने त्याच्यावर इतका चांगला परिणाम झाला. अंगुलीमाल बुद्धाच्या उपदेशाने बदलला. श्रवण हे विद्या ग्रहणाचे प्रवेशद्वार आहे. त्याचा वापर यज्ञीय भावनेनेच करणे योग्य होय. कानांनी जसे ऐकतो, तसे विचार तरंग उठत असतात. शाहीराचे पोवाडे ऐकले की बाहू फडफडतात! वात्सल्य व करुण रसाची कविता ऐकली की डोळे पाणावतात. त्यामुळे योग्य तेच कानांनी ऐकावे व अभद्र ऐकणे टाळावे.

पूर्वीच्या काळी ऋषि-मुनी

पावसाळ्यात जंगल सोडून नगराजवळ येत. नगरातील लोकांनाही या काळात कामातून उसंत असते. त्यामुळे चार महिने चातुर्मास पर्वाचे आयोजन केले जाई. मोठे यज्ञ होत असत. वेदकथांचे आयोजन केले जाई. ते श्रावणी पर्वापासूनच ! कारण श्रावणी पर्व म्हणजे वेदारंभ होय. गुरुकुलात ब्रह्मचाऱ्यांना प्रवेशही याच महिन्यात दिला जाई. यज्ञोपवीत संस्कार देखील याच दिवशी करीत. जीवनात यज्ञोपवीतसंस्कार अतिमहत्वाचा आहे. त्यामुळे जीवनाचा कायापालट होतो. माणूस द्विज बनतो. त्याचा दुसरा जन्म होतो. यज्ञोपवितातील तीन धागे १)पितृऋण २) देवऋण ३) ऋषिऋण याची आठवण देतात. दुसऱ्या दृष्टीने विचार केल्यास यज्ञोपवीताने आत्मिक, बौद्धिक व सांसारिक या तीन क्षेत्रात प्रवेश होतो.

आत्मिक क्षेत्रात विवेक, पवित्रता व शांती ही तत्त्वे आहेत. बौद्धिक क्षेत्रात साहस, स्थिरता, कर्तव्यनिष्ठा ह्या बाबी येतात. सांसारिक क्षेत्रात स्वास्थ्य, धन, सहयोग ही मुद्दे येतात. जो यज्ञोपवीताचा सखोल विचार करुन जीवनाची वाटचाल करतो, त्याचाच दुसरा जन्म (द्विज) होतो व तोच अभ्युदय व नि:श्रेयस् प्राप्त करु शक्तो. यज्ञोपवीत गुरु व यज्ञाच्या साक्षीने ब्रह्मचाऱ्यास देतात आणि स्वाध्यायाचा आरंभ करवितात. तसेच जीवनाच्या कल्याणासाठी शुभाशीर्वाद देतात. यज्ञामुळे वायुशुद्धी, जलशुद्धी व आरोग्य प्राप्त तर होतेच, परंतु संगठन शक्तीचे व आत्मिक उन्नतीचे संवर्धन होते. माणूस हा खरा माणूस बनतो व नंतर तो देवत्वाला प्राप्त होतो.

नंतरच्या काळात याच पर्वाला **'रक्षाबंधन'** असे संबोधले जाऊ लागले. बहीण भावाच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून राखी बांधते व भाऊ तिच्या रक्षणाचे वचन देतो. अशा या पवित्र पर्वापासून आपण दुसऱ्या स्त्रियांना बहिणी समान मानण्याचे शिकले पाहिजे. या गोष्टीची सध्याच्या काळात जास्त गरज आहे. अनेक ठिकाणी मुली-महिलांवर अत्याचार होतात. ते ऐकून मन विषन्न होतं. मनात येऊन जातं 'हाच का शिवरायांचा देश? रामबंधू लक्ष्मणाचा देश? हीच काय म.दयांनदांची भूमी?

रामायण काळात एकच रावण होता. सध्या पावलोपावली रावण आहेत. त्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी तेवढेच राम आवश्यक आहेत. मर्दानों उठा! श्रावणी पर्वाच्या पावन मुहूर्तावर

संकल्प करु या! मी असतांना रावणाची काय मजाल की, तो परस्त्रियांवर अत्याचार करील. अशा दुष्टांचा नायनाट करुन मला जगाला आर्य बनवायचं आहे तरच माझे जीवन सार्थ! नसता कीड्यामुंग्यांसारखे जीवन काय कामाचे? तुकाराम महाराज जे म्हणतात, ते खरेच आहे.–'नाही तरी काय थोडी। श्वान सुकटे बापुडी।।'

सारांश हाच की, श्रावणी पर्वाचे आपल्या जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. जगावर उपकार करणे, हे आपले ध्येय आहे. शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नती करणे हा आर्य समाजाचा सहावा नियम सांगतो. त्यासाठी आरोग्य कसे राखावे? स्वत: व्यसनमुक्त होऊन इतरांना निर्व्यसनी बनवणे, प्राणायाम, ध्यान, धारणा, स्वाध्याय इत्यादींद्वारे आरोग्य व आत्मिक प्रगती कशी होईल? याचे उद्‌बोधन करणे आपले काम आहे. त्यासाठी आरोग्य शिबिरे, ध्यानयोग शिबिरांचे आयोजन करावे. सेवा, त्याग, परोपकार, बंधुभाव, समता, नैतिकता, देशभक्ती, प्रबोधन आदींच्या सहाय्याने समाज सुसंघटित करणे ह्या सर्व बाबी आपणांस वेद, उपनिषद्, सत्यार्थ प्रकाश इ.ग्रंथातून मिळतात.तर चला मग आजपासून या ग्रंथाचा स्वाध्याय करु या! 'वेदांचे शिकणे, शिकविणे आणि ऐकणे, ऐकविणे हे आपले परमकर्तव्य आहे.'हे पार पाडण्यासाठी आपण कटिबद्ध होऊ या! परमेश्वर आमच्या सत्कार्याला आशीर्वाद देवो, हीच प्रार्थना!

(लेखक महाराष्ट्र आर्य प्र.सभेचे वेदप्रचार अधिष्ठाता आहेत.)

– 'पंचप्रकाश', विद्यानगर,
परळी–वैजनाथ
मो.९४२०२६९९२४

राज्यस्तरीय पुरोहित प्रशिक्षण शिबिर उत्साहात

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेतर्फे आर्य समाज परळीच्या पूर्ण सहकार्याने दि.२ ते ९ जुलै २०१७ दरम्यान राज्यस्तरीय पुरोहित प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न झाले. श्रद्धानंद गुरुकुल आश्रम, परळी येथे पं.राजवीरजी शास्त्री यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात जवळपास ३० शिबिरार्थी सहभागी झाले होते. सर्वांनी उत्तमरित्या या शिबिराचा लाभ घेतला.(विस्तृत वृत्त पुढील अंकात)

पूर्णत्वाकडे नेणारी-'श्रावणी पौर्णिमा'

– पं.राजवीर शास्त्री

श्रावणी पौर्णिमेला बहुतांश लोक नारळी पौर्णिमा व राखी पौर्णिमा म्हणूनच ओळखतात. परंतु आर्य जगतात हा दिवस **'श्रावणी उपाकर्म'** या नावाने साजरा केला जातो. 'श्रावणी उपाकर्म' हा वैदिक पर्व(सण) आहे. पर्व या शब्दाचे पूरक व पूर्णता असे अर्थ होतात. व्यक्ती व समाजाच्या पूर्ण उन्नती व विकासासाठी जे सण व उत्सव दिशादर्शक, सहाय्यक, पोषक, पूरक व प्रेरक ठरतात. त्या सण व उत्सवाला 'पर्व' असे म्हणतात. श्रावणी उपाकर्म हा सण 'पर्व' या शब्दाला साजेसा असाच आहे. हा सण श्रावणी पौर्णिमेदिवशी साजरा केला जातो. याचे औचित्य असे की 'श्रावणी उपाकर्मा' चा अंतिम उद्देश्य 'पौर्णिमा' या शब्दातून स्पष्ट होतो. ज्या दिवशी चंद्र आकाशात पूर्णपणे प्रकाशित होतो, त्या दिवसाला पौर्णिमा म्हणतात आणि पौर्णिमेचा हा पूर्ण चंद्र मानवाला हीच प्रेरणा देतो की, – 'हे मनुष्यांनो ! मी पूर्ण झालो. तुम्ही ही पूर्ण व्हा.' परमात्मा हा एकच आहे. परंतू विद्वान लोक त्याला अनेक नावाने ओळखतात. त्या अनेक नावांपैकी पौर्णिमा हे देखील परमात्म्याचे एक नाव आहे. कारण तो पूर्ण (मा) आहे. परमात्मा हा सर्वव्यापक, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे. तो सर्व दृष्टीने पूर्ण आहे, परिपूर्ण आहे. म्हणून तो परितृप्त आहे. त्याच्या आनंद स्वरुपाचे रहस्य त्याच्या परिपूर्णतेत आहे, असे म्हणायला हरकत नाही. तात्पर्य असे की, पूर्णतेत पूर्ण सुख आहे, तर अपूर्णतेतच सुख-दु:खाचे मिश्रण आहे आणि आपल्याला दु:ख विरहित सुखाची अभिलाषा आहे. तेंव्हा अपूर्णतेकडून पूर्णत्वाकडे वाटचाल करणे अगत्याचे आहे. पौर्णिमेचा चंद्र पहा कसा हर्षमुखी झाला आहे? द्वितीयेच्या चंद्रकोरीवर एवढी कळा नव्हती, जेवढी आज त्याच्या मुखावर आली आहे. त्याची ज्योत्स्ना सर्वत्र पसरली आहे. त्यामुळे आकाश शोभिवंत झाला आहे. पृथ्वी विभावरी बनली आहे. त्याला झालेला आनंद गगनात मावेनासा झाला आहे. तो सर्वत्र ओसंडून वाहतो आहे.

यावरुन हेच स्पष्ट होते की जो पूर्ण आहे, तोच आनंदी असू शकतो आणि जो स्वत: आनंदी आहे, तोच इतरांना

आनंद देऊ शकतो. म्हणून पूर्ण होण्याचा ध्यास सर्वांनी घेतला पाहिजे. आत्मा हा एकदेशी आहे आणि तो अल्पज्ञ व अल्पशक्तियुक्त आहे. म्हणून त्याचा जन्मजन्मांतराचा प्रवास सुख-दु:ख मिश्रितच असला पाहिजे. अशी बळजबरी परमात्मा करीत नाही. आत्मा सुख-दु:खाच्या बाहेर जाऊन शाश्वत सुखाची प्राप्ती करुन घेऊ शकतो. ही स्वतंत्रता परमात्म्याने जीवात्म्याला दिली आहे. त्याच्या कल्याणासाठी दयाळू परमात्म्याने 'वरदा वेदमाता' प्रस्तुत केली आहे. ईश्वरीय ज्ञानाचे नाव 'वेद' आहे. हे ज्ञान मानवमात्रास वरदायक असे आहे. वेदातील ज्ञान-विज्ञान व उपदेश मानवमात्राच्या आचरणात यावेत व व्यवहारात उतरावेत, यासाठी आपल्या प्राचीन ऋषी-मुनींनी चार वर्ण व चार आश्रमांची आखणी व्यवस्थितपणे केली. तसेच पंचमहायज्ञ, सोळा संस्कार व वैदिक पर्व प्रचलित केले. वैदिक धर्म सोपा केला. अभ्युदय व नि:श्रेयस यांची सिद्धी पण सहज केली.

मनुष्यांची भटकंती संपावी व तो असत्याकडून सत्याकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अविद्येकडून विद्येकडे, मृत्युकडून अमरतेकडे वाटचाल करणारा व्हावा. संसारी वृत्तीकडून निवृत्तीकडे वळावा. अपूर्णतेकडून पूर्णतेकडे प्रवृत्त व्हावा, यासाठीच ही सद्भावना सण व उत्सवांच्या नियोजनामागे दडली आहे.

'उपाकर्म' या शब्दाचा अर्थ आहे - जवळ घेऊन जाणे. अर्थात पालकाने आपल्या पाल्यास श्रुती (वेद) च्या शिक्षणासाठी आचार्याकडे नेऊन गुरुकुलात प्रविष्ट करणे होय. प्राचीन काळी श्रावणी पौर्णिमेपासून वेदाध्ययनास विधिवत् प्रारंभ होत असे. उपनयन संस्काराने वेदारंभ व्हायचा. याशिवाय गृहस्थाश्रमी लोकांसाठी उपाकर्म विधि सांगितली आहे. यादिवशी यज्ञविधिपूर्वक जुने यज्ञोपवीत उतरवून नूतन यज्ञोपवीत धारण केले जाते आणि श्रावण ते कार्तिक महिन्यापर्यंत वेदांचा कसून स्वाध्याय करण्याचे विधान आहे. श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी जे नक्षत्र असते, त्याचे नाव आहे 'श्रवण'! श्रवण आणि श्रावण या शब्दांचा अर्थ आहे- ऐकणे व ऐकविणे आणि शिकणे व शिकविणे! या ठिकाणी श्रुती (वेदा) चेच ऐकणे व ऐकविणे आणि शिकणे व शिकविणे, असा अर्थ अभिप्रेत आहे. स्वामी दयानंदांनी याला परमधर्म म्हंटले आहे. कारण या परमधर्माचे पालन केल्याने व्यक्ती पूर्णत्वाला पोहोंचू शकते.

वेदाच्या स्वाध्यायाला पर्याय नाही. म्हणूनच श्रावणी पौर्णिमेदिवशी वेदाच्या स्वाध्यायाची मुहूर्तमेढ रोवावी लागते.

अमृतपुत्रांनो ! पर्व, पौर्णिमा किंवा पूर्णता या शब्दाने गोंधळून जाऊ नका. तुम्हाला वाटेल फक्त परमात्माच पूर्ण असू शकतो. जीवात्म्याला पूर्ण होणे शक्यच नाही. कितीही आणि कांहीही केले तरी आत्मा कधी परमात्मा बनू शकत नाही. हा विचार संभ्रम निर्माण करणारा आहे. हा निराशाजनक विचार असून तो पुरुषाला पुरुषार्थहीन बनविणारा आहे.

इथे चंद्राचेच उदाहरण घेऊ! चंद्र हा परप्रकाशित आहे. त्याचे अस्तित्व स्वयंप्रकाशित सूर्याच्या प्रकाशावर अवलंबून आहे. चंद्राला अमावस्येच्या दाट अंधारात आपले अस्तित्व गमावून बसण्याची इच्छा नाही. त्याला पौर्णिमेच्या आनंदाची अभिलाषा आहे. त्याने सूर्याचे शिष्यत्व पत्करले. त्याची उपासना सुरू केली. उपाकर्म आरंभ झाला. दिवसेंदिवस थोडया-थोड्या अंशाने तो स्वत:ला सूर्यासमोर घेऊन जाऊ लागतो. अमावस्येनंतर शुक्लपक्षरुपी सकारात्मकता फुलू लागते. द्वितीयेला चंद्राची कोर चमकते. पण तृतीया चतुर्थी असे करता-करता पंधराव्या दिवशी त्याच्या चिकाटीला व प्रयत्नाला पूर्ण यश प्राप्त होते. पूर्ण चंद्राच्या रुपात तो आकाशात झळकतो. तो अतिशय आनंदी होतो. त्याच्या आनंदाने निसर्गात ही आनंदाला भरती येते. त्याच्या शीतल व शुभ्र चांदण्याने वातावरण रसभरीत होतं. तो सर्वांना सूर्यापेक्षाही अधिक जवळचा वाटतो. 'चंदामामा' किंवा 'चांदूमामा' या संबोधनातून त्याची लोकप्रियता स्पष्ट होते. यातच त्या चंद्राची पूर्णता आहे. चंद्राची पूर्णता सूर्य बनण्यात नाही. तर चंद्राने पूर्णपणे विकसित व प्रकाशित होण्यात आहे. गुलाबाच्या कळीची पूर्णता पूर्णपणे उमलण्यात, विकसित गुलाबाचे फूल बनण्यात आहे. असेच आत्म्याच्या बाबतीतही समजावे. आत्म्याने परमात्मा बनण्याचे स्वप्न पाहणे वेडेपणाचे आहे. तसेच आत्मा कधी पूर्णत्वास पोहोंचू शकत नाही. म्हणून निराश व हताश बनून राहणे हा वेडेपणाच आहे. आत्म्याची उन्नती (आत्मोन्नती) हीच आत्म्याची पूर्णता म्हणायची. त्याच्या पूर्ततेसाठी परमात्म्याची भक्ती करणे गरजेचे आहे. आत्म्याला परमात्म्याच्या निकट घेऊन जाणे याचेच नाव **'उपाकर्म'**! स्वाध्याय धर्माच्या

बळावरच अल्पज्ञ आत्म्याला सर्वज्ञ परमात्म्याच्या पूर्णपणे सान्निध्यात जाणे शक्य आहे. याशिवाय दुसरा मार्ग नाही. जसे चंद्राला पूर्ण बनण्यासाठी पूर्वाभिमुख व्हावे लागले. तसे आत्म्यालाही पौर्वात्य संस्कृतीचा अर्थात वैदिक धर्माचा व वैदिक संस्कृतीचा अवलंब करावा लागेल. कारण पाश्चिमात्य संस्कृति ही धोक्याची आहे. कुणी तरी म्हटले आहे–

'युवकों का डिस्को डान्स देखकर,
संस्कृत का शिक्षक उब गया
और कहने लगा– सूरज भी
पश्चिम में ढला, तो डूब गया ।'

तेंव्हा नित्य, नियमित व श्रद्धापूर्वक वेद आणि वेदानुकूल ग्रंथाचा स्वाध्याय करणे, त्याचबरोबर स्वत:चेही अध्ययन करणे, आत्मनिरीक्षण करणे, आपल्या गुण–कर्म–स्वभावात काही त्रुटी अथवा दोष आढळल्यास त्यांना दूर करणे, दुरुस्त करणे, स्वत:ला दैवी संपतीने परिपूर्ण बनविणे, स्वत:ला परमात्म्याच्या मैत्रीस योग्य बनविणे यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नाला पुरुषार्थ म्हणतात. पुरुषार्थाने पुरुष परमात्मा बनत नाही. परंतू तो महात्मा निश्चित बनतो. महापुरुष निश्चित बनतो. वेदाच्या स्वाध्यायाने मनुष्य विद्वान, धर्मात्मा व सदाचारी बनतो. सत्य, समता, दम, अमात्सर्य, क्षमा, लज्जा, तितिक्षा, त्याग, ध्यान, धैर्य, निरंतर दया व अहिंसा हे गुण अंगी येतात. प्रश्नोपनिषदकाराच्या मते जो ऋग्वेदाचा स्वाध्याय करतो, त्याला मनुष्य लोकांची प्राप्ती होते. पृथ्वीचे भोग व ऐश्वर्य मिळते. यजुर्वेदाच्या स्वाध्यायकर्त्याला चंद्रलोकाची प्राप्ती होते. सौम्य गुणांनी तो लाभान्वित होतो. सामवेदाच्या स्वाध्यायाने सूर्यलोक प्राप्त होतो. सूर्याप्रमाणे त्याचे जीवन तेजस्वी व महिमामय बनते आणि तिन्ही वेदाच्या उपदेशानुसार परमात्म्याची उपासना केल्यास त्याला परब्रह्माची प्राप्ती होते. सच्चिदानंद स्वरुपाचे दर्शन घडते. एकंदरीत स्वाध्यायाने शरीर, मन, बुद्धी व आत्म्याची मलिनता दूर होते. अंत:करण पवित्र बनते. त्याची सात्विकता, निर्मळता,पवित्रता ही त्याच्या वाणी व व्यवहारातून प्रकट व्हायला लागते. तो गोड व्यक्तिमत्वाचा धनी बनतो. तो लोकांचा आवडता बनतो. ही आध्यात्माची परिपक्वता आहे. आत्म्याची पूर्णता आहे. तेंव्हा श्रावणी पौर्णिमाला हातची व्यर्थ जाऊ देऊ नका, पकडून ठेवा आणि पूर्ण व्हा...!

निदान आर्यसमाजी लोकांनी तरी

याचा गांभीर्याने विचार करावा व परमधर्माचे पालन करावे. त्यामुळे स्वत:चे कल्याण तर होईलच, पण त्याचबरोबर जगावर उपकार करण्याचा आर्य समाजाचा मुख्य उद्देश्य ही साध्य होऊन तो सफल होईल. आर्य समाजी होणे म्हणजे जगावर उपकार करण्याची जबाबदारी खांद्यावर घेणे आहे आणि ही जबाबदारी तोच समर्थपणे पेलू शकतो, जो स्वत: स्वाध्यायशील आहे. श्रावणी उपाकर्म हा फक्त जानवे बदलण्याचा सण नाही, तर त्या सोबत आपले जीवनमानही बदलले पाहिजे. जसे यज्ञोपवीत अत्यंत पवित्र आहे, परमात्मा शुद्ध व पापरहित आहे. तसे आपले जीवनही निष्पाप बनले पाहिजे. अंत:करणाचा निर्मळ, स्वभावाने प्रेमळ व व्यवहारात सत्य-सरळ असलेल्या व्यक्तीचे जीवन दीर्घायुष्यी, बलयुक्त व तेजयुक्त बनते. त्यासाठी वेदाचे शुद्ध ज्ञान आत्मसात करावे लागते. श्रद्धा व निष्ठापूर्वक स्वाध्याय व सत्संगात रमावे लागते व वेदमय व्हावे लागते. जो वेदांचा(निकटचा) होत नाही, त्याच्या वेदना कमी होत नाहीत. श्रावणी उपाकर्म विधिमध्ये यज्ञोपवीत धारण करण्यामागे व यज्ञाहुती देण्यामागे हीच प्रेरणा दडलेली आहे. श्रावणी उपाकर्म साजरा करणे म्हणजे - सन्ध्या, स्वाध्याय, सत्संग, सेवा व सत्कर्म करण्याच्या व्रतात स्वत:ला बांधून घेणे आहे. ही बांधीलकी न स्वीकारताच केवळ यज्ञोपवीत धारण करणे व यज्ञाहुती देणे म्हणजे - कवी गोपीनाथ शिवपुरकराच्या शब्दात असे सांगता येईल-

'भक्तीचे हे गाणे, माणूसकीला उणे,
रुढीचे तुणतुणे, धर्म माझा...'

आज सर्वत्र रुढीच्या तुणतुण्याचाच नाद आहे. बऱ्याच परिवारात आर्ष ग्रंथाचा दुष्काळ आहे. वैदिक ग्रंथालयाचा अभाव आहे. बरीचशी वाचनालये वाचकांभावी कपाटबंद आहेत. वैदिक सत्संग ओस पडताहेत. या सर्व उणिवा तुमच्या-आमच्यातील प्रमादीपणाची साक्ष देतात. तेंव्हा -

'औरों को अमृत देने का दम्भ नही अच्छा।
अपने मन का विष पच जाय तो काफी है।'

यावरुन हेच स्पष्ट होते की, जो पूर्ण आहे, तोच आनंदी असू शकतो आणि जो स्वत: आनंदी आहे, तोच इतरांना आंनद देऊ शकतो.

- आर्य समाज, बुधवार पेठ,
सोलापूर मो.९८२२९९००११

औरंगाबाद येथे कन्या संस्कार शिबिर उत्साहात

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेच्या मार्गदर्शनाखाली आर्य समाज गारखेडा औरंगाबाद च्या वतीने दि.२ ते ९ मे २०१७ दरम्यान शहराच्या हर्सूल परिसरातील संत ज्ञानेश्वर वेद विद्या प्रतिष्ठाण येथे 'आर्य कन्या (आत्मरक्षा) वैदिक संस्कार शिबिर' उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात १४ ते २२ वर्षे वयोगटातील जवळपास ८५ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. शिबिराचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री जयसिंगरावजी गायकवाड पाटील यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात दिल्लीहून आलेले प्रमुख प्रशिक्षक श्री आचार्य धर्मवीरजी आर्य व त्यांच्या सहकारिणी कु.सृष्टी आर्य, कु.दीपिका आर्य व कु.कीर्ती आर्य यांनी मुलींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. यात प्रामुख्याने शारीरिक व्यायाम, योगासने, कराटे, लाठी, भाला, सुरी, तलवार, रायफल आणि मल्लखांब शिकविण्यात आले. त्याबरोबरच मुलींचा बौद्धिक व आत्मिक विकास साधावा यासाठी वैदिक मानवतावाद, नैतिक संस्कार, ध्यान, आहार पद्धती, अंधश्रद्धा निर्मूलन, धर्म संस्कृती, वैदिक सिद्धांत, वर्ण व आश्रम पद्धती, वेद प्रतिपादित स्त्री जीवन, वर्तमान मत-पंथ व जाती निर्मुलन आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रबोधन करण्यात आले. दररोज पहाटे ४.३० ते रात्रौ ९.३० पर्यंतच्या व्यस्त दिनचर्येत मुलींचा सर्वांगिण विकास साधावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले.

शिबिरादरम्यान सर्वश्री प्रा.डॉ.नयनकुमार आचार्य, प्रा.रमेश ठाकुर, आचार्य धर्मवीरजी, प्रा.अर्जुनराव सोमवंशी, दत्ता मुळे, जगदीश सुर्यवंशी, ॲड.शिवाजीराव शिंदे, सुभाष वेदपाठक आदींनी मार्गदर्शन केले. भजनोपदेशक पं.प्रतापसिंहजी चौहान यांनी मधुर भजने सादर करुन प्रेरणा दिली. सौ.सुमनताई चौहान यांनी यज्ञाचे पौरोहित्य केले. शिबिरकाळात सभेचे मंत्री श्री माधवराव देशपांडे यांनी सपत्निक भेट देऊन मुलींना मार्गदर्शन केले.

समारोपदिनी सकाळी शिबिर स्थळ ते हरसिद्धदेवी मंदिर, हर्सूल गाव या

भागात शिबिरार्थीनींची शोभायात्रा काढण्यात आली. यात तरुणींनी चौका-चौकात कवायती व लाठी, तलवार, रायफल यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. शिबिराचा समारोप श्री जयसिंगराव गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात 'राष्ट्राची खरी शक्ती तरुण मुले व मुली असून त्यांना सुसंस्कारित करण्याच्या कार्यात आर्य समाज भरीव कामगिरी करीत आहे. मुलींसाठी आयोजित हे शिबिर निश्चितच नव्या भविष्यासाठी प्रेरणादायी सिद्ध होईल.' ते पुढे म्हणाले - 'खऱ्या अर्थाने मानवता हाच खरा धर्म असून युवतींनी वेदमार्गाचा अवलंब करुन आपल्या जीवनाचे सर्वकल्याण साधण्याचा प्रयत्न करावा. केवळ कर्मकांड म्हणजेच धर्म नव्हे तर धर्म हा आपल्या आचार-विचार व व्यवहारातून व्यक्त झाला पाहिजे.'

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री डॉ.लक्ष्मण माने, सौ.ज्योती तोष्णीवाल, सौ.अंजुताई माने, ॲड.जोगिंदरसिंह चौहान, ॲड.मिराताई बिराजदार, माजी पोलीस आयुक्त खुशहालचंद बाहेती, पं.दुर्गादास मुळे, नगरसेविका अंकिता विधाते आदींनी प्रयत्न केले.

शहापूरच्या संस्कार शिबिराला उत्तम प्रतिसाद

प्रांतीय सभेच्या वतीने शहापूर (ता.देगलूर जि.नांदेड) येथे स्थानिक आर्य समाजाच्या पूर्ण सहकार्याने दि.१० ते १६ मे २०१७ दरम्यान 'मानवता संस्कार व आर्यवीर दल शिबिर' अतिशय उत्साहात संपन्न झाले. गावातील जि.प. प्रशालेच्या इमारतीत आयोजित या शिबिरास प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिल्ली येथील सार्वदेशिक आर्यवीर दलाचे प्रधान व प्रशिक्षक आचार्य श्री हरिसिंहजी आर्य यांना आमंत्रित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन आर्य समाजाचे प्रधान श्री गंगारेड्डी भूपतवार यांच्या हस्ते आर्यवीर दल ध्वज फडकावून करण्यात आले. शिबिरात श्री हरिसिंहजी आर्य यांनी मुलांना व्यायाम, योगासन, प्राणायाम, लाठी-काठी, विविध कवायती, कराटे आदींचे प्रशिक्षण दिले. तर वैदिक विद्वान सर्वश्री प्रा.नयनकुमार आचार्य; प्रा.अखिलेश शर्मा, प्रा.अर्जुनराव सोमवंशी, लक्ष्मणराव आर्य गुरुजी आदींनी विद्यार्थी जीवन

महत्त्व, ब्रह्मचर्य, वैदिक संस्कृती, आदर्श दिनचर्या, खानपान, मानवीय मूल्य, मातृ-पितृ सेवा, ईश्वराचे खरे स्वरूप आदी विषयांसह सामाजिक, राष्ट्रीय व नैतिक दृष्ट्या मौलिक मार्गदर्शन केले.

तसेच आर्य भजनोपदेशक पं.प्रतापसिंहजी चौहान, पं.वैजनाथअप्पा करकेले यांनी विविध भजने गाऊन विद्यार्थ्यांमध्ये वातावरण निर्मिती केली. संयोजन कार्यात श्री वैजनाथराव हार्लिगे यांनी मोलाची भूमिका बजावली.

शिबिराचा समारोप शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रसिद्ध विधिज्ञ ॲड.दिनेश शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत व नांदेड जि.प.चे शिक्षण व आरोग्य सभापती माधवराव मिसाळे, रमेश पाटील हंगरगेकर यांच्या सानिध्यात संपन्न झाला.

हे शिबिर सफल करण्यासाठी प्रधान श्री गंगारेड्डी भूपतवार, मंत्री नरसारेड्डी वालावर, कोषाध्यक्ष हनमन्लू पुल्लागोर, सरपंच गंगारेड्डी कोटगिरे, माजी सरपंच विठ्ठलरेड्डी पुल्लागोर, डॉ.सुरेश पुल्लागोर, प्रा.तिरुपती रेड्डी इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले. या शिबिरासाठी गावातून जवळपास ४० ते ५० हजार रुपयांचा निधी जमविण्यात आला होता.

६, ७, ८ ऑक्टोबरला मंडाले ब्रह्मदेशात

आंतर्राष्ट्रीय आर्य महासंमेलनाचे आयोजन

आध्यात्मिक व सामाजिक दृष्ट्या सुप्रसिद्ध अशा ब्रह्मदेशात (म्यानमार) येत्या ६, ७ व ८ ऑक्टोबर २०१७ रोजी आंतर्राष्ट्रीय आर्य महासंमेलनाचे भव्य स्वरुपात आयोजन होत आहे.

थोर देशभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व इतर क्रांतिकारकांनी ज्या मंडाले येथील तुरुंगात काळ्या पाण्याची सजा भोगली. त्याच भूमीत हे संमेलन होत असल्याने महाराष्ट्रातील आर्यबांधवांच्या दृष्टीने ही समाधानकारक बाब आहे. सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेच्या मार्गदर्शनाखाली मंडालेच्या अंबिकामाता मंदिर परिसरात हे संमेलन घेतले जाणार आहे. या संमेलनासाठी प्रवास व्यवस्था ८ ते ९ दिवसांची असून एका व्यक्तीसाठी रु.१५,०००/- (रु.पंधरा हजार) खर्च येणार आहे. इच्छुकांनी व्यवस्थापक श्री एस.पी. सिंह ९५४००४०३२४ यांचेशी संपर्क करावा.

शोकवार्ता

प्रा.मारुतीराव चिद्री यांचे निधन

उदगीरच्या श्यामलाल स्मारक अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य व राज्यातील विविध ठिकाणच्या तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे निवृत्त अधिव्याख्याते प्रा.श्री मारुतीराव मल्लप्पा चिद्री यांचे दि.१२ जुलै रोजी सकाळी लातूरच्या देशिकेंद्र शाळा परिसरातील राहत्या घरी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. मृत्युसमयी ते ८० वर्षे वयाचे होते. त्यांच्या पश्चात् पत्नी ललितादेवी, दोन मुले प्रा.श्री विनय व उद्योजक श्री अभय, दोन मुली सौ.सुजाता बजरंग मदनसुरे, सौ.ऋता आनंद रायकर, दोन भाऊ श्री अर्जुन व श्री श्रावण, सुना व नातू-नाती असा परिवार आहे. स्व.श्री चिद्री हे पूज्य उत्तममुनिजींचे जावई होते.

बीदर (कर्नाटक) जवळील चिद्री या गावी जन्मलेल्या श्री चिद्री यांचे बालपण व शिक्षण अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून झाले. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी जळगाव, कराड, लातूर, औरंगाबाद, मुंबई, अमरावती, उदगीर आणि उस्मानाबाद या ठिकाणी अध्यापन केले.

विद्यार्थी अवस्थेपासूनच ते मानवनिर्मित जातीभेद, अंधश्रद्धा व रुढी-परंपरा यांविरोधी होते.श्री राम मास्तर व उत्तम मुनिंजींच्या प्रेरणेने त्यांचा १९६१ साली आंतरजातीय विवाह झाला व ते आर्य समाजाकडे वळले. आपल्यासह आपले दोन्ही बंधु, मुला-मुलींचे व पुतणे-पुतणींचे आंतरजातीय विवाह घडवून त्यांनी समाजासमोर जात-पात निर्मूलनाचा आदर्श उभा केला आहे. अलिकडील कांही वर्षापासून ते अस्थमा आजाराने अस्वस्थ होते.

त्यांच्या पार्थिवावर रात्री ८वा. खाडगाव स्मशानभूमीत पूर्ण वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. सर्वश्री ॲड.जोगेंद्रसिंह चौहान, सभेचे उपप्रधान राजेंद्र दिवे, वैजनाथराव हालिंगे, किशनराव राऊत, नयनकुमार आचार्य आदींनी हा अंत्यविधी पार पाडला. तिसऱ्या दिवशी पं.वेदमुनिजी वेदालंकार यांच्या पौरोहित्याखाली परिवारात शांतियज्ञ संपन्न झाला.दिवंगत आत्म्यास सभेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

।। कृण्वन्तो विश्वमार्यम् ।।

वेदों की ओर लौटो !

वेद प्रतिपादित मानवीय
जीवन मूल्यों को
जन-जन तक पहुँचाने हेतु
कार्यतत्पर सशक्त एवं समर्थ प्रान्तीय आर्य संगठन

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा

(पंजीयन-एच. 333/र.नं.६/टी.इ. (७)१६७/१०४९,
स्थापना ५ मार्च १९७७)

- 'वैदिक गर्जना' मासिक मुखपत्र
- आर्य समाज दिनदर्शिका
- पू. हरिश्चन्द्र गुरूजी गौरव-'मानवता संस्कार एवं आर्यवीरदल शिविर'
- आर्य कन्या वैदिक संस्कार शिविर
- पातञ्जल ध्यानयोग शिविर
- प्रान्तीय आर्य वीर दल प्रशिक्षण शिविर
- पुरोहित प्रशिक्षण शिविर
- मानव जीवनकल्याण वेद प्रचार (श्रावणी) उपाकर्म अभियान
- स्व. विठ्ठलराव बिराजदार स्मृति विद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- सौ. तारादेवी जयनारायणजी मुंदडा विद्यालयीन राज्य.निबंध स्पर्धा
- सौ. कलावतीबाई व श्री मन्मथअप्पा चिल्ले (आनन्दमुनि) महाविद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- विद्यार्थी सहायता योजना
- सौ.डॉ. विमलादेवी व श्री डॉ.सु.ब.काले (ब्रह्ममुनि) महाविद्यालयीन राज्य. निबन्ध स्पर्धा
- स्व.पं. रामस्वरूप लोखण्डे स्मृति संस्कृत राज्य प्रतियोगिताएं
- मानवजीवन निर्माण अभियान - विद्यालय व महाविद्यालयों के लिए (वैदिक व्याख्यानमाला)
- शान्तिदेवी मायर स्मृति मानवनिर्माण एवं सेवा योजना
- स्व. भसीन स्मृति एवं मायर गौरव स्वास्थ्य रक्षा एवं चिकित्सा शिविर
- शान्तिदेवी मायर विधवा सहायता योजना
- वैदिक साहित्य भेट योजना
- पंथ-जातिप्रथा निर्मूलन अभियान
- वैदिक साहित्य प्रकाशन योजना
- आपत्कालीन सहायता योजना
- पर्जन्यवृष्टि यज्ञ अभियान
- गौ-कृषि सेवा योजना
- स्वा.सै.श्री गुलाबचंदजी लदनिया गौरव राज्य योगासन प्रतियोगिता
- सौ.धापादेवी गु. लदनिया गौरव राज्य प्राणायाम प्रतियोगिता

दि.१० से १६ मई के दौरान शहापूर ता.देगलूर में आयोजित संस्कार शिविर के उद्घाटन अवसर पर आर्य समाज के पदाधिकारी, विद्वान व शिविरार्थी।



ध्वजारोहण करते हुए आर्य समाज शहापूर के प्रधान श्री गंगारेड्डी भूपतवार,आचार्य हरिसिंहजी। साथ में हैं सर्वश्री एनमन्लू पुल्लागोर, करकेले, हालिंगे, चौहान आदि।



व्यायाम व योगासन का प्रशिक्षण प्राप्त करते हुए शिविरार्थी।

Reg.No.MAHBIL/2007/7493*Postal No.L/Beed/18/2015-17

सेवा में,
श्री. _____

_____ _____ _____ _____

प्रेषक -
मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
आर्य समाज, परली-वैजनाथ.
पिन ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र)

यह मासिक पत्र सम्पादक व प्रकाशक श्री मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा द्वारा वैदिक प्रिंटर्स, परली वैजनाथ इस स्थलपर मुद्रित कर महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के संपर्क कार्यालय आर्य समाज, परली वैजनाथ ४३१५१५ (महाराष्ट्र) इस स्थान से प्रकाशित किया।

भावपूर्ण श्रद्धांजलि !

स्व.श्री.सदाशिवरावजी गुट्टे

॥ ओ३म् ॥

आर्य समाज, परली-वैजनाथ, जि.बीड
के दिवंगत वरिष्ठ कार्यकर्त्ता, भजनोपदेशक
तथा कट्टर वेदानुगामी व्यक्तित्व
स्व.श्री.सदाशिवरावजी पाटलोबा गुट्टे
के द्वितीय स्मृतिदिवस (७ जून २०१७) के उपलक्ष्य में
उनकी धर्मपत्नी **श्रीमती सुशीलाबाई गुट्टे व परिवार**
की ओर से **वैदिक गर्जना** मासिक का रंगीन मुखपृष्ठ भेंट

जीवेत् शरदः शतम् !

श्रीमती सुशीलावाई गुट्टे